महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

==========================================================================

जावक क्रमांक – ४०५० / ५८ दिनांक :- १० ऑक्टोबर, २०२४

**प्रसिद्धिपत्रक**

# म्हाडा कोंकण मंडळातर्फे १२,६२६ सदनिका व ११७ भूखंडांच्या विक्रीकरिता सोडत जाहीर

- ११,१८७ सदनिका प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य योजनेअंतर्गत उपलब्ध
- ११ ऑक्टोबर २०२४ रोजी म्हाडाचे उपाध्यक्ष श्री. संजीव जयस्वाल यांच्या हस्ते सोडतीचा 'गो-लाइव्ह' समारंभ
- २७ डिसेंबर रोजी पात्र अर्जांची सोडत

मुंबई, दि. १० ऑक्टोबर, २०२४ : म्हाडाच्या कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे ठाणे शहर व जिल्हा, कल्याण, टीटवाळा, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग मधील ओरस, वेंगुर्ला व मालवण येथील विविध गृहनिर्माण योजनेअंतर्गत १२,६२६ सदनिकांच्या विक्रीकरिता सोडत जाहीर करण्यात आली आहे. यापैकी ११,१८७ सदनिका प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या योजनेअंतर्गत विक्रीकरिता उपलब्ध करण्यात आल्या असून अर्ज नोंदणी व अर्ज भरणा प्रक्रियेचा शुभारंभ शुक्रवार दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी दुपारी १२.३० वा. म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या हस्ते सोडतीचा 'गो-लाइव्ह' कार्यक्रमांतर्गत करण्यात येणार आहे.

कोंकण मंडळातर्फे जाहीर करण्यात आलेली ही सोडत दोन घटकांमध्ये विभागण्यात आली आहे. कोंकण मंडळाच्या संगणकीय सोडतीमध्ये IHLMS 2.0 या नूतन संगणकीय प्रणाली व ऍपच्या साहाय्याने १४३९ सदनिकांकरिता अर्ज नोंदणी प्रक्रियेस उद्या दुपारी १२.३० वाजेपासून सुरवात होणार आहे. सोडतीत सहभाग घेण्याकरिता अर्जदार IHLMS 2.0 ही सोडतीची संगणकीय आज्ञावली अर्जदार अँड्रॉइड (android) अथवा आयओएस (ios)या दोन्ही ऑपरेटिंग सिस्टिमच्या साहाय्याने आपल्या मोबाईलवर डाउनलोड करू शकतात. तसेच अर्जदारांच्या सोयीकरिता https://housing.mhada.gov.in या म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज नोंदणी प्रक्रिया उपलब्ध करून देण्यात आली आहे. अर्जदारांना नवीन संगणकीय प्रणालीची माहिती देणारी मार्गदर्शनपर माहितीपुस्तिका, ध्वनीचित्रफिती, हेल्प फाईल आणि हेल्प साईट या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे. सोडत प्रक्रियेत सहभाग घेण्यापूर्वी

अर्जदारांनी या मार्गदर्शनपर माहितीचे अवलोकन करावे, असे आवाहन कोंकण मंडळाच्या मुख्य अधिकारी श्रीमती रेवती गायकर यांनी केले आहे.

कोंकण मंडळाने जाहीर केलेल्या सदनिका विक्री सोडतीत अर्जदार १० डिसेंबर, २०२४ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत सहभाग घेऊ शकतात. त्यानंतर सोडतीत सहभाग घेण्याची लिंक या प्रणालीवरून निष्क्रिय करण्यात येणार आहे. दिनांक ११ डिसेंबर, २०२४ रात्री ११.५९ पर्यंत अर्जदार अनामत रक्कमेचा भरणा ऑनलाईन करू शकतील, तसेच दिनांक ११ डिसेंबर, २०२४ रोजी संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत RTGS / NEFT द्वारे अनामत रकमेचा भरणा अर्जदारांना करता येईल. अशाप्रकारे सर्व कागदपत्रांची पूर्तता करणारे अर्जदार या प्रणालीद्वारे पात्र ठरविले जातील. सोडतीसाठी पात्र अर्जांची प्रारूप यादी १८ डिसेंबर , २०२४ रोजी सायंकाळी ६.०० वाजता म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर दिनांक २० डिसेंबर , २०२४ रोजी सायंकाळी ५ .०० वाजेपर्यंत अर्जदारांना प्रारूप यादीवर आपल्या दावे व हरकती नोंदविता येणार आहेत. अंतिमतः २४ डिसेंबर रोजी सोडतीत सहभाग घेणाऱ्या अर्जांची यादी म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे.

दिनांक २७ डिसेंबर , २०२४ रोजी सकाळी १० वाजता पात्र अर्जाची संगणकीय सोडत जाहीर केली जाणार आहे. अर्जदारांना सोडतीचा निकाल तात्काळ मोबाईलवर एसएमएस द्वारे , ई-मेल द्वारे तसेच ऍपवर प्राप्त होणार आहे.

IHLMS 2.0 या संगणकीय प्रणाली अंतर्गत अर्ज नोंदणी जरी अमर्याद काळ सुरु राहणार असली तरी कोंकण मंडळाने जाहीर केलेल्या सदनिका विक्री सोडतीत अर्जदार १० डिसेंबर, २०२४ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत सहभाग घेऊ शकतात. त्यानंतर सोडतीत सहभाग घेण्याची लिंक या प्रणालीवरून निष्क्रिय करण्यात येणार आहे. दिनांक ११ डिसेंबर, २०२४ रात्री ११.५९ पर्यंत अर्जदार अनामत रक्कमेचा भरणा ऑनलाईन करू शकतील, तसेच दिनांक ११ डिसेंबर, २०२४ रोजी संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत RTGS / NEFT द्वारे अनामत रकमेचा भरणा अर्जदारांना करता येईल. अशाप्रकारे सर्व कागदपत्रांची पूर्तता करणारे अर्जदार या प्रणालीद्वारे पात्र ठरविले जातील. सोडतीसाठी पात्र अर्जांची अंतिम यादी ०४ डिसेंबर , २०२४ रोजी सायंकाळी ६.०० वाजता म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. दिनांक २७ डिसेंबर , २०२४ रोजी सकाळी १० वाजता पात्र अर्जाची संगणकीय सोडत जाहीर केली जाणार असून अर्जदारांना सोडतीचा निकाल तात्काळ मोबाईलवर एसएमएस द्वारे , ई-मेल द्वारे तसेच ऍपवर प्राप्त होणार आहे.

प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य योजनेअंतर्गत ११,१८७ सदनिका उपलब्ध आहेत. या योजनेअंतर्गत https://lottery.mhada.gov.in या संकेत स्थळावर नोंदणी करून इच्छित सदनिकेसाठी अर्ज भरावयाचा आहे. अर्ज भरतेवेळी अर्जदारांना केवळ आधार कार्ड आणि पॅन कार्ड प्रणालीमध्ये अपलोड करावयाचे आहे. तसेच आधार कार्डशी संलग्न असेला मोबाइल क्रमांक व पासपोर्ट साइज फोटो ऑनलाइन सादर करावयाचा आहे. नोंदणी प्रक्रियेनंतर अर्जदार इच्छित सदनिकेकरिता ऑनलाइन पेमेंट करू शकतील. प्रथम येणार्या स प्रथम प्राधान्य ही योजना त्या त्या योजनेतील सदनिका उपलब्ध असे पर्यंतच कार्यरत राहील याची अर्जदारांनी नोंद घ्यावी.

ही सोडत दोन घटकांमध्ये विभागण्यात आलेल्या सोडतीत प्रथम येणार्या स प्रथम प्राधान्य या योजनेअंतर्गत ११,१८७ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत अत्यल्प उत्पन्न गटासाठी ९८८३ सदनिका, १५ टक्के एकात्मिक शहर योजनेअंतर्गत ५१२ सदनिका , २० टक्के सर्वसमावेशक योजनेअंतर्गत एकूण ६६१ सदनिका उपलब्ध असणार आहेत. कोंकण मंडळातर्फे उभारण्यात आलेल्या विखुरलेल्या १३१ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

तसेच दुसऱ्या घटकमध्ये १४३९ सदनिकांचा समावेश आहे. यामध्ये २० टक्के सर्वसमावेशक योजनेअंतर्गत एकूण ५९४ सदनिका उपलब्ध असणार आहेत. कोंकण मंडळातर्फे उभारण्यात आलेल्या विखुरलेल्या ६०७ सदनिका आणि ११७ भूखंड विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

सोडतीसंदर्भात अर्ज भरतांना अर्जदारांना येणाऱ्या अडचणीचे निराकरण करण्यासाठी ०२२ - ६९४६८१०० या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

श्रीमती गायकर यांनी सोडतीत सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या अर्जदारांना आवाहन केले आहे की, नूतन संगणकीय सोडत प्रणाली ही संपूर्णतः ऑनलाईन व पारदर्शक असून यामध्ये कोणत्याही प्रकारे मानवीय हस्तक्षेपास वाव नाही. शिवाय या सदनिकांच्या विक्रीकरिता मंडळाने कोणालाही प्रतिनिधी, सल्लागार व प्रॉपर्टी एजंट नेमलेले नाही. त्यामुळे अर्जदाराने कोणत्याही त्रयस्थ /दलाल/ मध्यस्थ व्यक्तीच्या प्रलोभनांना बळी पडू नये. तसेच अशा प्रकारच्या गैरव्यवहारास अथवा फसवणुकीस कोंकण मंडळ अथवा म्हाडा जबाबदार राहणार नाही. तसेच त्यांनी आवाहन केले आहे की सोडत प्रक्रियेमध्ये म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावरून सहभाग घ्यावा.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

**सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**

Public Relations Department

Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==========================================================================

Outward No. : 4050/58 Dt. 10th October, 2024

Press Release

## MHADA Konkan Board Announces Lottery for the Sale of 12,626 Housing Units and 117 Plots

- 11,187 units available under the First-Come, First-Served scheme
- Go-Live ceremony to be inaugurated by MHADA Vice President Shri. Sanjeev Jaiswal on October 11, 2024
- Lottery for eligible applicants on December 27, 2024

Mumbai, 10 October, 2024: The Konkan Housing and Area Development Board, a regional unit of MHADA, has announced a lottery for the sale of 12,626 housing units under various housing schemes located in Thane city and district, Kalyan, Titwala, Palghar, Raigad, Ratnagiri, and Sindhudurg's Oras, Vengurla, and Malvan. Of these, 11,187 units will be available under the First-Come, First-Served (FCFS) scheme. The registration and application process for the lottery will commence on Friday, October 11, 2024, at 12:30 PM, with the Go-Live ceremony being inaugurated by MHADA Vice President and CEO Mr Sanjeev Jaiswal.

The Konkan Board's lottery is divided into two segments. The first includes 1,439 units, and applicants can register through the IHLMS 2.0 system starting 11th October, 2024, at 12:30 PM. Applicants can download the IHLMS 2.0 app for Android and iOS devices or complete the registration on MHADA's official website at https://housing.mhada.gov.in . For the convenience and guidance of the applicants, information booklet, videos, and help files will be made available on the website. Chief Officer of the Konkan Board, Mrs Revati Gaikar, has advised all applicants to thoroughly review the provided materials before starting the registration process.

Applicants must submit their forms by 11:59 PM on December 10, 2024. The registration link will be deactivated afterward. Earnest Money Deposit (EMD) payments can be made online until 11:59 PM on December 11, 2024, or via RTGS/NEFT during banking hours.

The provisional list of eligible applicants will be published on 18th December, 2024, at 6:00 PM, with the final list released on December 24, 2024. Meanwhile, applicants can raise objections to the provisional list until December 20, 2024, at 5:00 PM.

The Lottery draw will be held on 27th December, 2024, informed Mrs Gaikar.

However, the First-Come, First-Served scheme will remain open only until all units are booked. Under this scheme, 9,883 units are available through the Pradhan Mantri Awas Yojana (PMAY) for economically weaker sections, along with 512 units under the 15% Integrated Urban Housing Scheme and 661 units under the 20% Comprehensive Housing Scheme. Additionally, 131 scattered dwelling units of the Konkan Board are available.

The second segment includes 1,439 units, with 594 units under the 20% Comprehensive Housing Scheme, and 607 scattered units along with 117 plots for sale.

For assistance with the application, please contact the MHADA helpline at 022-69468100.

Smt. Gaikar further emphasized that the IHLMS 2.0 system ensures full transparency with no manual intervention. She warned applicants not to fall prey to unauthorized agents or intermediaries, as MHADA has not appointed anyone in this capacity. Any such engagements will not be the responsibility of MHADA or the Konkan Board. Applicants are advised to participate solely through MHADA's official website.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA